मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
**सायबर गुन्हे कक्ष**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-११९/२०२२ दिनांक – २८/०४/२०२२

# Alpemix Remote Desktop या ॲपवरुन फसवणूक झालेली रक्कम परत मिळविण्यात सायबर गुन्हे कक्षाला यश....

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत वसई पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसम अशद मुल्ला वय – ३७ वर्षे, रा.वसई यांची दिनांक १२-३/२०२२ रोजी सकाळी ०८.४५ वा सुमारास फिर्यादी यांना कामानिमीत्त मुंबईला जायचे असल्याने त्यांनी ओला कार बुक करता येत नव्हती त्यावेळी फिर्यादी यांना ९८२७७०९५२४ हा मोबाईल धारकाने फिर्यादी यांना फोन करुन **Alpemix Remote Desktop** हा ॲप डाऊनलोड करुन आपण आधी ६/- रुपये पेमेंट करा असे सांगून फिर्यादी यांची एसबीआय बँकेचे क्रेडीट कार्डवरुन एकून १,००,९४०/- रुपये जमा करुन घेवून फिर्यादी यांची फसवणूक केलेबाबत वसई पोलीस ठाणे गु.रजि.नं. ८०/२०२२ भादंविसं कलम ४२० सह माहीती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनीयम २००८ चे कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

नमुद गुन्हयाची तांत्रीक माहीती मिळणेबाबत वसई पोस्टे जा.क्र.१९७१/२०२२ दिनांक १४/०३/२०२२ अन्वये पत्र इकडील कार्यालयात प्राप्त झाले होते. सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने संबधित बँकेशी पत्रव्यवहार करुन फिर्यादी यांची फसवणूक झालेली १,००,९४०/- रुपये एकुण रक्कम पुन्हा त्यांचे मुळ खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोशि/१२०९५ गणेश इलग, पोशि/१२०९२ प्रविण आव्हाड, मपोशि/१३१०४ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कस्टमर केअर कर्मचारी असल्याचे सांगून कोणी संपर्क साधल्यास **Alpemix Remote Desktop** किंवा इतर कोणतेही रिमोट असिस्टंट सॉफ्टवेअर डाऊनलोड करु नये. अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

---oo---